VOL- VI ISSUE-XI NOVEMBER 2019 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 5.707 ISSN 2349-638x

# जागतिकीकरणात ग्रंथालयाचे महत्त्व

**श्रीमती प्रतिभा भीमराव गायकवाड**
कार्यालय आधीक्षिका
महाराष्ट्र उदगीर महाविद्यालय, उदगीर

२१व्या शतकात ग्रंथालय आणि माहिती केंद्रे यांना अतिशय मागणी आहे रिसोर्स शेअरिंग म्हणजे भागीदारी / सहकारी तत्वावर चालणारे साहित्याचे उपयोजन साहित्याच्या उपयोजनात ग्रंथपालासाठी साधनांची सीमा नाही स्थानिक, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय यामध्ये ग्रंथालयाचे जाळे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. या ग्रंथालयाच्या जाळ्यात जागतिक नेटवर्क चा समावेश आहे. व्यावसायिक ग्रंथालये या जाळ्याशी संबंधित आहेत ते गरजेनुसार असलेली माहिती या जाळ्यातून मिळवतात.

शोध संज्ञा - जागतिकीकरण ग्रंथालये माहिती केंद्रे

**प्रस्तावना-**

गेल्या तीन दशकांत आपल्या देशात अनेक विशेष ग्रंथालये प्रलेखन केंद्र माहिती केंद्र निरनिराळया अधिपत्याखाली आली आहेत जगात अनेक क्षेत्रात संशोधन होत आहे संशोधन कार्यास माहितीची गरज भासते काही संस्था संशोधनसाठी कार्यरत आहेत आणि या साठी पैसा जागा या गोष्टी महत्त्वाच्या आहेत म्हणून भागिदारीस सहभागाचा अवलंब करावा हे मान्य झाले आहे. आजच्या आधुनिक युगात भागिदारीच्या व्यवसायाचे स्वरुप अनेक क्षेत्रात प्रचलित आहे

अनेक व्यापारात भागिदारीच्या स्वरुपाचा अवलंब केला जात आहे. आधुनिक कामांमध्ये नेटवर्क ही संकल्पना आपल्या दैनंदिन जीवनाचा जवळजवळ अविभाज्य भागच झाली आहे. कळत न कळत आपण कुठल्या ना कुठल्या सेवेचा लाभ घेतच असतो. ज्यामध्ये इंटरनेट, रेल्वे आरक्षण, ग्रंथालय नेटवर्क या माहितीचे नेटवर्क आणि या दळणवळणातील प्रगत तंत्रज्ञानावर आधारित सेवांचा त्यात समावेश होतो.

जागतिकरण म्हणजे संपूर्ण जगाची एका मोठया बाजारपेठेत रुपांतरित होण्याची प्रक्रीया होय, वस्तू सेवा तसेच भांडवल आणि श्रम यांचा व्यापारावरील निर्बंध उठवून जागातिक पातळीवरील व्यापार मुक्तपणे घडवून येण्याची प्रक्रीया यात सामावलेली आहे. ही संज्ञा अलीकडे लोकप्रीय झाली आहे. तरी ही प्रक्रिया १९ व्या शतकापासून सुरु झाली. सागरी दळणवळण टेलीग्रामपासून ते २० व्या शतकातील उपलब्ध हवाई मार्ग, दुरध्वनी, संगणक बहुराष्ट्रीय कंपन्या व्यापार आणि गुंतवणुकीवरील निर्बंध यामधील लवचिकतेतून जागतिकीकरण सुरु झाले. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि २१ व्या शतकाच्या पूर्वाधात माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट आणि सेवांचा व्यापार जागतिक पातळीवर खुला झाल्याने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतला आहे. जागतिकरणाच्या प्रक्रियेमध्ये कोणतीही व्यक्ती स्वातंत्र्य अथवा विभक्त समुहाचा भाग न राहता संपूर्ण समाजच थेट जागतिक व्यवहाराशी जोडला गेला आहे.

ग्रंथालयाच्या दृष्टिकोनातून इफला सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थेने वाचन साहित्याचा सामूहिक उपयोग या संकल्पनेला प्रोत्सहन दिले आहे. अर्थात हा उपयोग आंतरराष्ट्रीय स्तरावर आहे म्हणजेच देशादेशात वाचनसाहित्याचा सामुहिक उपयोग होवून देशातील संस्कृतीविषयी सर्व जगात माहिती व्हावी एका देशातील साहित्य दुस-या देशात सहज उपलब्ध व्हावे हा त्यामागील हेतू आहे. यासाठी इफलाने दोन संकल्पना मांडल्या आहेत.

1. Univeral Bibliographic control (1974) UBC
2. Universal Availability control (1976) UAP

इफलाच्या या कार्याचा भाग म्हणून प्रत्येक देशाने आपली इन्फॉर्मेशन पॉलिसी निश्चित करावी ही संकल्पना पुढे आली व त्याप्रमाणे अनेक देशांनी आपआपल्या इन्फॉर्मेशन पॉलिसी बनविल्या. ग्रंथालयाच्या वाचन साहित्याच्या किमंती भरभर वाढत आहेत. जगामध्ये दरवर्षी सुमारे पाच लाख ग्रंथ प्रकाशित होत आहेत. यामुळे ग्रंथालयांच्या आर्थिक स्थितीचा विचार करता सर्व प्रकाशित होणारे वाचनसाहित्य कोणत्याही एका ग्रंथालयाला खरेदी करणे शक्य नाही. संगणक व दळणवळणाच्या तंत्रज्ञानात प्रगती झाल्याने माहितीचा परिस्फोट झाला आहे. ग्रंथालयीन वाचकांच्या मागण्या वाढल्या आहेत. विविध विषयांवर मोठया प्रमाणावर संशोधन होवू लागले आहे. संशोधकांनाही आपल्या क्षेत्राशी संबधित कोणत्या विषयांवर संशोधन चालू आहे याची माहिती महत्त्वपूर्ण वाटू लागली आहे. म्हणूनच संशोधक ग्रंथालयात जावून माहितीचा शोध घेवू लागले आहेत.

आधुनिक युगात माहितीची निर्मिती प्रचंड प्रमाणात होत आहे आणि त्या मानाने उपयोजकांचा वेळ शक्ती आणि पैसा कमी पडतो आहे. विशेषतः विज्ञान आणि तंत्रज्ञान यावरील माहिती नियतकालिकातून सतत प्रसिध्द होत त्यांच माहितीची संशोधकाना गरज असते त्यासाठी ग्रंथापाल व प्रलेखक यांनी ग्रंथालय सहकार आणि ग्रंथालयाचे जाळे तयार करण्याचा मार्ग शोधला आहे. सर्वोत्तम ग्रंथालय आणि माहिती सेवा देणे हाच आधुनिक ग्रंथालयाचा एकमेव उद्देश आहे. आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय स्तरावरील ग्रंथालये एकमेकांशी संलग्न होऊन साहित्याचे उपयोजन करुन वाचकाच्या विविध गरजा पुरविण्याचे कार्य आज मोठ्या प्रमाणावर करत आहेत.

**सारांशः-**

डिजिटल मिडिया, इंटरनेट अशा गोष्टींचा प्रभाव वाढवणा-या सध्याच्या काळात अध्यापन शैलीप्रमाणे ग्रंथालयांनाही कार्यपद्धतीमध्ये कालानुरुप बदल करणे गरजेचे आहे. महाविद्यालयीन शिक्षण प्रणालीमध्ये प्राध्यापकांद्वारे केल्या जाणा-या अध्यापनासोबत ग्रंथालयाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी व व्यक्तिमत्व विकासाठी ग्रंथालयाचे योगदानही महत्त्वाचे आहे. ग्रंथालयातील ज्ञानभांडार विद्यार्थ्यांच्या ज्ञानजर्नात रुपांतर करण्याच्या प्रक्रियेत ग्रंथपालाची भूमिका महत्त्वाची आहे. मात्र ग्रंथपालानीही आपल्या कामकाजात अधिकाधिक विद्यार्थीभिमुखता आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेतली पाहिजे. ग्रंथालय हा सातत्याने वृध्दिगंत होत जाणारा घटक तितक्याच गांभीर्याने लक्ष देण्यासाठी ग्रंथपालासोबत सर्वांनी पुढे यायला हवे.

**संदर्भ सूचीः-**

१. फडके, द. ना. २००७ ग्रंथालय संगणीकरण आणि आधुनिकीकरण पुणे, युनीव्हर्सल प्रकाशन.
२. नरगुंदे रेवती, १९९६ , प्रलेखन आणि माहितीशास्त्र, पुणे युनिव्हर्सल प्रकाशन
३. रायखेलकर ए, आर, १९९९ औद्योगिक अर्थशास्त्र, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स.
४. Kherde Mohan R. Need of the partnership of LIS schools and Academic Libraries in the present scenario.